# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतंर्गत कार्यरत असलेल्या महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने "मी सावित्री बोलतेय" हा प्रा. मिनाक्षी वाघमारे यांचा एकपात्री प्रयोग आज दि. २३ रोजी आयोजित करण्यात आला.

सत्यशोधक समाज स्थापना दिनानिमित्त या एकपात्री कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत घेण्यात आला. याप्रसंगी जळगाव येथील एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाच्या प्रा.मिनाक्षी वाघमारे यांनी सावित्रीबाई फुले यांची भूमिका साकारली. त्यांनी प्रयोग सादर करतांना सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर प्रकाश टाकला. सावित्रीबाई यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्यास अनुसरून भूमिका सादर केली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संचालिका प्रा.मधुलिका सोनवणे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. पवित्रा पाटील, डॉ. आर.आर. चव्हाण, डॉ. अतुल बारेकर, प्रा. नेरकर यांची उपस्थिती होती. सूत्र संचालन गौरव हरताळे याने केले. व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होते.

**बातमी नं. १**

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात शासकीय होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सहकार्याने शनिवार दि. २३ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या मोफत होमिओपॅथिक शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या पुढाकाराने आरोग्य केंद्राच्यावतीने विविध सुविधा विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थी व कर्मचा-यांसाठी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आता दर महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारी होमिओपॅथिक औषधोपचार शिबीर घेतले जाणार आहेत. जळगावच्या शासकीय होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सहकार्याने मोफत औषधोपचार केले जाणार आहेत. आजच्या शिबिराचे उद्घाटन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या उपस्थितीत झाले. दुपारपर्यंत या शिबिराचा ५५ रूग्णांनी फायदा घेतला. शासकीय महाविद्यालयाचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश सरताळे, डॉ. मनोज विसपुते, डॉ. अजित विसपुते, डॉ. निलेश पाटील, डॉ. प्रताप वळसे यांच्यासह विद्यापीठाचे आरोग्य अधिकारी डॉ. सांरग खाचणे, डॉ. साजिया शेख आणि आणि आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेत मराठी विज्ञान परिषद, जळगाव यांच्या सहकार्याने "तरूणांनो संशोधनाकडे वळा" हा कार्यक्रम घेण्यात आला.

मुंबई येथील केमिकल टेक्नालॉजी संस्थेचे संशोधक मनोज देव यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रनिर्मितीत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधनाचे योगदान या विषयी सविस्तर माहिती दिली. मराठी विज्ञान परिषदेचे सचिव प्रा. दिलीप भारंबे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विश्वराज तायडे यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले. संचालक प्रा. जे. बी. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मोबाईल सायन्स व्हॅनमधील प्रयोगांचा जळगाव येथील बालविश्व इंग्लिश मिडीयम व बालविश्व प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांनी आनंद घेतला.

विद्यापीठातील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या माध्यमातून समन्वयक डॉ. एस. एस. घोष यांनी ही व्हॅन बालविश्व शाळेला उपलब्ध करून दिली. ७० विद्यार्थ्यांनी या व्हॅनमधील प्रयोग पाहिले. डॉ. घोष यांच्या समवेत अनिरूध्द मांगदीकर, लेखमाला इंगळे, लौकिक पाटील, गौरव पाटील या विद्यार्थ्यांनी प्रयोगांची माहिती दिली. जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील ज्या शाळांना विद्यार्थ्यांना फिरती विज्ञान प्रयोगशाळा दाखवायची असेल त्यांनी विद्यापीठाती राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे समन्वयक डॉ. घोष (८९९९५४५२९२) अथवा मोहिनीराज नेतकर (९४२२३३८१३२) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

.........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २३ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी